ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**

No,CGRF/AZ/JLN/166/2008/87/ Date :-

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer,**
**O&M Circle, M.S.E.D.C.L.,**
**Jalna**

Sub :- Forwarding of grievance in respect of M.S. Ware Housing Corporation Partur,Krushi Utpanna Bazar Sameti , Near Wadarwadi, Paradgaon Road, Partur, Dist.Jalna. (Con. No.524010038579 )

Dear Sir

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from M.S. Ware Housing Corporation Partur, Krushi Utpanna Bazar Sameti Near Wadarwadi, Paradgaon Road, Partur, Dist. Jalna.

**The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of excess/average bills.**

You are requested to submit your parawise reply at the time of hearing which will be held on **06.01.2009 at 13.00 Hours**

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above.

**Copy to:-**
M.S. Ware Housing Corporation Partur,
Krushi Utpanna Bazar Sameti ,
Near Wadarwadi, Paradgaon Road, Partur,
Dist Jalna

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**


No,CGRF/AZ/JAL/166/2008/87/ Date :-

**To** The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Jalna Circle, M.S.E.D.C.L.,

Sub:- Forwarding of grievance in respect of M.S. Wakhar Mahamadal Partur, Dist Jalna
(Con. No.524010038579 )

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from of M.S. Wakhar Mahamadal Partur, Dist Jalna

You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with related documents.

**The hearing in this matter is kept on 06/01/2009 at 12=30 Hrs.**

**Member/Secretary**
Consumer Grievance Redressal Forum,
MSEDCL (AZ) Aurangabad.

**Encl As above**.

Copy to :

Shri Vijy Bhagwanrao Bhopi,
Deshpande Road Partur,
Dist Jalna

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना/१६६/२००८/८७**

**तक्रार दाखल दिनांक ;- २२/१२/२००८**
**निकाल दिनांक ;- २९/०१/२००९**

**म.रा. वखार महामंडल,परतुर कृ.उ.बाजार समिती,**
**वडारवाडी जवळ,पाडरगांवरोड,**
**परतुर जिल्हा जालना.**
**(ग्राहक क्र.५२४०१००३८५७९) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित जालना.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २२/१२/२००८ रोजी जालना मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, जालना यांना पाठविण्यात आली. नोडल अधिकारी यांना त्यांचे म्हणणे मंचास दाखल करण्याकरीत दिनांक ०६/०१/२००९ ही तारीख देण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार यांचे परतुर, जिल्हा जालना, येथे वखार महामंडाळाचे कार्यालय असुन त्यांनी महावितरण कंपनीतर्फे वीज पुरवठा घेतला आहे. महावितरण कंपनीतर्फे नियमीतपणे वीज बिल मिळत नसल्यामुळे त्यांना ते दिलेल्या मुदतीत भरता आलीले नाहीत. दिनांक २०/०८/२००८ रोजी महावितरण कंपनीतर्फे देण्यात आलेल्या वीज बिलात त्यांना ४१९०.००/-रूपयाचे व्याज लावण्यात आले. याबाबत त्यांनी महावितरण कंपनीच्या संबंधीत विभागाकडे तक्रार केल्यानंतर सुध्दा बिला लावण्यात आलेली व्याजाची रक्कम कमी करून देण्यात आली नाही. त्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन सुधारीत वीज बिल देण्याची महावितरण कंपनीस आदेश देण्याची विनंती केली आहे.

२) दिनांक ०६/०१/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदारातर्फे साठा अधिक्षक श्री भोपी उपस्थित होते. महावितरण तर्फे नोडल अधिकारी श्री सागजकर उपस्थित होते. त्यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला. अर्जदारास मिटरवरील रिडींगप्रमाणे वीज बिल दिले गेले नसल्याचे मान्य केले व बिल रिव्हीजन करून देण्याची तयारी दर्शविली. मंचाने अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत न करण्याचे आदेश देत पुढील सुनावणी दिनांक १७/०१/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक १७/०१/२००९ रोजी जालना येथील महावितरणच्या प्रशिक्षण विभागातील सभाग्रहात झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते. त्यांनी वीज बिल रिव्हीजन प्रस्तावात व्याजाची रक्कम कमी करून देण्याचा त्यांना अधिकार नसल्याचे सांगितले. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवले.

४) अर्जदार व महावितरणचे नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरून असे आढळुन येते की,नोव्हेबर २००८ मध्ये अर्जदारास देण्यात आलेल्या वीज बिलाची एकुण रक्कम ३८३४८-१९/-रूपये अशी असुन त्यात ५८८७-८४ रूपये ही व्याजाची रक्कम समाविष्ट आहे. नोडल अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अर्जदाराच्या मीटरची नियमीतपणे रिडींग घेण्यात आली नसल्याचे मान्य केले पण सुधारीत बिलातुन व्याज व दंड रद्द करण्याचे अधिकार त्यांना नसल्याचे म्हटले आहे. महावितरण कंपनीकडुन वीज बिल देण्यात चुकी आढळल्यास त्यात लावण्यात आलेले व्याज व दंड माफ करण्याचा अधिकार नसलेली कोणतेही कागदपत्रे नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेली नाहीत. एकीकडे अर्जदारास देण्यात आलेले वीज बिल चुकीचे असल्याचे मान्य करीत असतांना या चुकीच्या वीज बिलात लावण्यात आलेले व्याज व दंड रद्द करणे हे अपेक्षीत आहे.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर अर्जदाराने चुकीच्या बिलाबाबत केलेली तक्रार योग्य असल्याचे आढळुन आले. मंच या प्रकरणात खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास मिटरवरील रिडींग प्रमाणे सुधारीत बिल विभागुन द्यावे व या सुधारीत बिलात कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये. तसेच अर्जदाराने भरलेल्या रक्कमेची वजावट या सुधारीत वीज बिलातुन करावी.

२) वरील प्रमाणे देण्यात येणारे सुधारीत वीज बिल अर्जदारास ३० दिवसाच्या आत द्यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१६६/२००८/८७** **दिनांक ;-**

**प्रति,**
**म.रा. वखार महामंडल,**
**परतुर कृ.उ.बाजार समिती,**
**वडारवाडी जवळ,पाडरगांवरोड,**
**परतुर जिल्हा जालना.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१६६/२००८/८७ )

आपण दिनांक २२/१२/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. जालना मंडळ, जालना**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**